MHSO060014552021

नियमित दिवाणी दावा क्र. ९२/२०२१
प्रताप मस्के वगैरे
**वि.**
रफीक आत्तार वगैरे
CNRNo.MHSO060014552021

**आदेश निशाणी क्र. ८७**
(दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी पारीत)

प्रतिवादी क्र. १, ३ व ५ यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांच्या विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करून मिळावा, अशी मागणी केलेली आहे.

०२. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जातुन असे कळविले आहे की, प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे अशिक्षित असल्याने त्यांना वेळेवर महत्वाची कागदपत्रांची जुळवा—जुळव करता आली नसल्याने तसेच माहितगार वकीलाची भेट घेवून प्रस्तुत कामी कैफियत योग्य वेळेत दाखल करता आलेली नसल्याने, न्यायालयाने त्यांच्याविरूध्द विना कैफियतचा आदेश पारीत केलेला आहे. म्हणून त्यांनी सदरचा आदेश रद्द करून त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी परवानगी असावी, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. वादीने सदरच्या अर्जावर म्हणणे देवून विरोध केलेला आहे. त्याच्यानुसार सदर प्रतिवादी यांनी अर्जातील कारण संयुक्तिक नाही. तसेच प्रतिवादी हेतुपुरस्पर व वेळकाडूपणा करून प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करीत आहे व सदर विलंबाचे योग्य कारण नमूद केलेले नसल्याने अर्ज नामंजूर करावा, किंवा अर्ज मंजूर केल्यास त्यांच्यावर परिव्यय लादून मंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी यांनी विहीत तथा वाढीव कालावधीमध्ये कैफियत दाखल करणे आवश्यक

असताना तसे केलेले नाही. त्यामुळे न्यायालयाने त्याच्याविरुद्ध विना कैफियत असा आदेश पारीत केलेला आहे. वादीने त्याच्या म्हणण्यात सदर प्रतिवादी यांना महत्वाची कागदपत्रांची जुळवा—जुळव करण्यात वेळ गेल्याने व कागदपत्रे वेळेत प्राप्त न झाल्याने तसेच माहितगार वकीलाना भेटून त्यांना वेळेवर कैफियत दाखल करता आलेली नाही हे कारण नाकारलेले आहे. म्हणजेच प्रतिवादी यांनी विलंबाचे योग्य व स्पष्ट कारण नमूद केलेला नाही, असा आक्षेप वादीने घेतलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी नमूद केलेले विलंबाचे कारण योग्य आहे असे म्हणता येईल. तसेच कार्यपद्धतीची ही सुस्थापित स्थिती आहे की, कोणत्याही प्रकरणाचा निपटारा हा गुणवत्तेवर व्हावयास हवा आणि गुणवत्तेवर तो होण्यासाठी प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. परंतु विलंबाचा कालावधी मोठा असल्याने प्रतिवादीवर परीव्यय लादने उचित होणार आहे, म्हणून प्रतिवादीच्या विनंतीप्रमाणे अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

## **आदेश**

**०१.** अर्ज परीव्यय रक्कम रु. ३००/— लादून मंजूर करण्यात येत आहे;

**०२.** अर्जदार/प्रतिवादी पुढील तारखेपर्यंत परीव्यय रक्कम भरल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करून घेण्यास परवानगी देण्यात येईल;

SARIKA SANDEEP PAKHALE
Digitally signed by SARIKA SANDEEP PAKHALE
Date: 2026.02.10 17:19:10 +0530

दिनांक: १०.०२.२०२६.

(श्रीमती एस. एस. पाखले)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order/ Judgment are same word to word, as per the original Order/Judgment.

Name of the Stenographer : A. I. Khan,(Grade-II)
Name of the Court : C.J.S.D.,Pandharpur.
Judgment/Order signed by P.O. on : 10.02.2026,
Judgment/Order Uploaded on : 10.02.2026.